ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २० पुणें, बुधवार तारीख १३ ऑक्टोबर, १९५४ अंक ४०

## विविध माहिती

**मध्य-भारतामधील विकासकार्य**— मध्य-भारतांत गांधी-जयंतीच्या दिवशीं नॅशनल एक्सटेन्शन सर्व्हिसच्या दोन नव्या योजना सुरू करण्यांत आल्या. एक योजना गुणा जिल्ह्यांत आणि दुसरी शिवपुरी येथें चालू करण्यांत आली. प्रत्येक योजनेंत २५० खेड्यांच्या गटाचा समावेश करण्यांत आला आहे. दर योजनेसाठीं ७॥ लाख रुपये खर्च करण्यांत येणार आहेत सुमारें ७५,००० लोकांना तिचा फायदा मिळेल.

**जबलपूर येथें क्षयरोग्यांसाठीं इस्पितळ**—जबलपूर येथें क्षयरोग्यांसाठीं बांधण्यांत यावयाच्या इस्तिळासाठीं एक मोठी देणगी मिळाली आहे. मनुलाल जगन्नाथदास ट्रस्टचे ट्रस्टी, शेठ नरसिंगदास, ह्यांनीं ट्रस्टतर्फे इस्पिळाच्या कार्याला मदत म्हणून १ लाख रुपयांची देणगी देण्याचें जाहीर केलें आहे.

**प्राचीन नाणीं सांपडलीं**— जबलपूरपासून १० मैलांवर असलेल्या एका खेडेगांवीं शेतांत काम करीत असतांना एका शेतकऱ्याला १२० सोन्याचीं नाणीं सांपडलीं. नाण्यांच्या एका बाजूवर 'श्रीमत् गांगेयदेव' अशीं संस्कृत अक्षरें असून दुसऱ्या बाजूला लक्ष्मीदेवीचे हत्तींसह ठसे आहेत. ह्या नाण्याचा अभ्यास स्थानिक पुराणवस्तु-तज्ज्ञांकडून चालू आहे.

**इराणमध्यें परकीय तज्ज्ञ**—इराणमधील तेलाच्या ब्रिटिश मालकीच्या कंपन्या आणि इराणचें सरकार ह्यांच्यांत तंटा झाल्यापासून इराणचें तेल जगाच्या बाजारपेठेंत येईनासें झालें होतें. आतां हा पुरवठा चालू करण्याचे प्रयत्न जोरानें सुरू झाले आहेत. अबादान येथील तेलाच्या कारखान्यांची तपासणी करण्यासाठीं १२ आंतरराष्ट्रीय तेलविषयक तज्ज्ञ नुकतेंच इराणला गेले आहेत.

**सौंदर्य-प्रसाधनें विरुद्ध दारू**— कराची कॉर्पोरेशनच्या सभेंत पूरग्रस्तांना मदत देण्यासंबंधीं चर्चा चालू असतां पुरुष व स्त्री कॉर्पोरेटर्समध्यें बोलाचाली झाली. एका पुरुषसभासदानें असे उद्गार काढले कीं, स्त्रियांनीं ओठांना रंग लावण्याचें बंद करून वांचलेला पैसा मदत-फंडाला द्यावा. त्याबरोबर कांहीं स्त्री-सभासदांनीं पुरुषांच्या मद्यपानावर हल्ला चढविला. दारूवर होणारा भरमसाठ खर्च करण्यानें राष्ट्रीय उत्पन्न कमी होतें; दारू पिणें बंद करून पुरुषांनीं फंडाला मदत करावी असें स्त्रियांचें म्हणणें पडलें.

**मध्य-प्रदेशांतील भुईमुगाची लागवड**—चालू वर्षी मध्य-प्रदेशांतील भुइमुगाच्या लागवडीचें एकूण क्षेत्र सुमारें ५,०५,४०० एकर असावें असा अंदाज करण्यांत आला आहे. गेल्या वर्षीच्या एकूण क्षेत्रापेक्षा भुईमुगाच्या लागवडीखालील जमीन ३९,५०० एकरांनीं कमी आहे असें समजतें.

**पूरपीडितांना परकीयांची मदत**—पंतप्रधान पं. नेहरू ह्यांनीं पूरपीडितांना मदत करण्यासाठीं जो फंड उभारला आहे, त्याला जपानच्या पार्लमेंटचे सभासद मि. साटो ह्यांनीं व्यक्तिशः १,००० रुपयांची देणगी दिली आहे. पोलंडच्या दिल्ली येथील वकिलातीनें आपल्या सरकारतर्फे ५०,००० रुपयांची मदत दिली आहे.

**छापखानेवाल्यांची परिषद**—ऑल इंडिया प्रिंटर्स कॉन्फरन्सचें तिसरें अधिवेशन मद्रास येथें ता. ६ फेब्रुआरी, १९५५ पासून तीन दिवस भरणार आहे. भारताच्या सर्व भागांतून छापखान्यांचे प्रतिनिधी परिषदेला जाणार आहेत. ह्याच निमित्तानें छापखान्याच्या धंद्यासंबंधीं एक प्रदर्शन भरविण्यांत येणार असून तें तीन आठवडे खुलें राहील.

**कापूस पिकविणाऱ्यांची मागणी**—मध्यप्रदेशांतील कापूस पिकविणाऱ्या सहकारी शेती-संघटनांची एक सभा अमरावती येथें भरली होती. सभेला जमलेल्या प्रतिनिधींनीं भारतीय सरकारला उद्देशून असा ठराव मंजूर केला कीं, अन्नधान्याच्या उत्पादकांना त्यांनीं निर्माण केलेल्या मालाला किमान किंमत देण्याची व्यवस्था करण्यांत यावी.

**खताच्या उत्पादनांत वाढ**—सिंद्री येथील खताच्या कारखान्यांत दरवर्षी सुमारें ३ लाख टन खत निर्माण करण्यांत येतें. खतें तयार करण्याचे आणखी दोन कारखाने काढण्याचा भारतीय सरकार विचार करीत आहे, असें समजतें. खुद्द सिंद्री येथील कारखान्याचें उत्पादनहि कांहीं नवीन यंत्रें बसवून दरवर्षी १ लाख टनांनीं वाढविण्याचें घाटत आहे.

**गंगेवरील पुलासाठीं पोलाद**—पाटणा शहराजवळ गंगा नदीवर एक मोठा पूल बांधण्यांत येणार आहे. पुलावरून रेल्वे व इतर वाहनें जाण्याची अशा दोन्ही सोयी करण्यांत येतील. ह्या कामासाठीं लागणारें पोलाद एका ब्रिटिश कंपनीनें पुरविण्याचें कबूल केलें आहे. सुमारें ३५,००,००० पौंड किंमतीचें पोलाद लागेल, असा अंदाज आहे. पुलाची लांबी सुमारें १ मैल होईल आणि त्यांत ४०० फुटांच्या १३ कमानी असतील. भूकंपाचे धक्के सहन करण्यासाठीं खास रचना करण्यांत येईल असें समजतें.

**जपानला सभासदत्व मिळालें**—कोलंबो योजनेंत भाग घेणाऱ्या आशियांतील १४ राष्ट्रांनीं आणि पाश्चिमात्य राष्ट्रांनीं वरील योजनेचे सभासद होण्यासाठीं जपानला आमंत्रण दिलें आहे असें समजतें. जपानला सभासदत्वाचे संपूर्ण हक्क देण्यांत येणार आहेत. आग्नेय आशियाचा आर्थिक विकास घडवून आणण्याचा कोलंबो योजनेचा हेतु आहे.

### महाराष्ट्र बँकेच्या सहा नवीन शाखा

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. नें दसऱ्याच्या सुमुहूर्तावर पनवेल, भिवंडी, जव्हेरी बाजार (मुंबई), अहमदनगर, श्रीरामपूर आणि भवानी पेठ (पुणें), अशा सहा नव्या शाखा सुरू केल्या आहेत. भाटिया बँक लि. च्या त्या शाखा होत्या. महाराष्ट्र बँकेनें तिच्याशीं करार केला असून, तिच्या ठेवींची जबाबदारी पत्करली आहे व ठेवींच्या इतकीच जिंदगीहि घेतली आहे. त्यामुळें, ह्या सहा शाखा महाराष्ट्र बँकेकडे आल्या आहेत.

### बँक नोकरांच्या बोनसचा प्रश्न : अपिलास परवानगी

लेबर अपेलेट ट्रायब्यूनलच्या २८ एप्रिलच्या निवाड्यांतील बँक नोकरांच्या बोनसचे प्रश्नावर अपील करण्यास सुप्रीम कोर्टानें १६ बँकांना परवानगी दिली आहे. न्या. राजाध्यक्ष ह्यांचा बँक अवार्डवरील अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर अपिलाचें काम चालेल. ह्या सोळा बँकांत कांहीं विदेशी एक्सचेंज बँकांप्रमाणें सेंट्रल बँक ऑफ इंडिया, इंपीरिअल बँक ऑफ इंडिया आणि पंजाब नॅशनल बँक ह्या बँकाहि आहेत.


स्थापना १९३६

**युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा**

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस—*पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.*

शाखा-मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी व लोणंद

ता. ३१-१२-५३ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,९९,००० |
| ठेवी | रु. | ७१,६८,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ८६,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-१२-० | रु. ३-०-० | रु. ३-८-० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४-०-० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | ,, | १-०-० |
| चालू डिपॉझिट | ,, | ०-८-० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.

शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन


### रिझर्व्ह बँकेच्या डेप्युटी गव्हर्नरांच्या मोटारीचा विगर-परवानगी दुरुपयोग

ठाणा येथून मुंबईमध्यें दारू आणण्याचा बेकायदा प्रयत्न नुकताच उघडकीस आला. एका मोठ्या मोटारींतून ४ ऑक्टोबर रोजीं रात्रीं सुमारें १०० गॅलन दारू आणण्यांत येत असल्याचें पोलिसांना समजलें. शिव येथें मोटार रोखण्यांत आली, त्यांत दारू सापडली पण ड्रायव्हर व त्याचा साथीदार पळून गेले. एकास अटक करण्यांत आली आहे. रिझर्व्ह बँकेच्या एका डेप्युटी गव्हर्नराची मोटार मालकाच्या परवानगीवांचून घेऊन तिचा उपयोग दारू वहाण्यासाठी करण्यांत आला होता!

**"अर्था"चा दिवाळी अंक**

तज्ज्ञांचे लेख व आर्थिक महत्त्वाची माहिती एकत्र देणारा "अर्था"चा दिवाळी अंक नेहमीप्रमाणें प्रसिद्ध होईल.

हितचिंतक जाहिरातदारांनीं आपल्या जाहिराती सत्वर पाठवाव्या.

"अर्था"चा दि. १० चा अंक बंद राहील.


म्यूच्युअल कंपन्यांत सर्वांत अधिक बोनस वाटणारी महाराष्ट्रांतील अग्रेसर विमा कंपनी!!

**दि सेन्ट्रल म्यूच्युअल लाईफ इन्शुरअरन्स कं. लि.**

हयातींतील विम्यास : दरसाल दर हजारीं रु. ७

हयातीनंतरच्या विम्यास: ,, ,, ,, रु. ९

ठिकठिकाणीं प्रतिनिधी नेमणें आहेत.

६७ अपोलो स्ट्रीट फोर्ट, मुंबई

शं. न. आगाशे, मॅनेजिंग डायरेक्टर

**दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.**

**( शिड्यूल्ड बँक )**

**प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग**

पुणें २. ( टे. नं. २७६३ )

| | |
|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. ७,२४,११० |
| खेळतें भांडवल | रु. ७५,००,००० |

मुंबई शाखा:—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.


**बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.**

श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.

श्री. सी. टी. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर. टे. नं. २६०७

# अर्थ

बुधवार, ता. १३ ऑक्टोबर, १९५४


संस्थापक : प्रो. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे


## सहकारी इन्स्टिट्यूटची वार्षिक सभा

### सर जे. ए. मदन ह्यांचा अध्यक्षीय आढावा

मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटची वार्षिक सभा दि. ४ रोजीं भरली होती, त्यावेळीं इन्स्टिट्यूटचे चेअरमन, सर जे. ए. मदन, ह्यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत इन्स्टिट्यूटच्या गेल्या वर्षांतील कार्याचा आढावा घेतला. अहवालाचे वर्षीं, सहकारी चळवळीचा सुवर्ण–महोत्सव साजरा करण्यांत आला. त्यानिमित्तानें उत्पन्न झालेला उत्साह टिकून राहील व सहकारी चळवळीच्या वाढीस हातभार लावील, अशी आशा अध्यक्षांनीं व्यक्त केली. सुवर्णमहोत्सवाच्या सप्ताहाचें उद्घाटन करण्यासाठीं पंतप्रधान, पंडित नेहरू ह्यांना पाचारण केलें होतें. त्यांनीं ह्या प्रसंगानें सहकारी चळवळीशीं आत्मीयता व्यक्त केली व ह्या चळवळीचें राष्ट्रीय व जागतिक गुंतागुंतीचे प्रश्न सोडविण्याचे कामीं साहाय्य होईल, असा विश्वास प्रकट केला.

इन्स्टिट्यूटचे सध्यांचे व्हाइस चेअरमन आणि पूर्वींचे मुंबई सरकारचे सहकार–अर्थ मंत्री श्री. वैकुंठराय मेहता ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भारत सरकारनें सहकारी शिक्षणासाठी एक मध्यवर्ती कमिटी स्थापन केली आहे. ह्या कमिटीनें, सहकारी खातीं व संस्था ह्यांत नेमलेला व नेमावयाचा अधिकारी व नोकरवर्ग सहकारतज्ज्ञ करावयाचा आहे व त्यासाठीं व्यवस्था करावयाची आहे. पुणें येथील सहकारी ट्रेनिंग कॉलेजमधील शिक्षणक्रम त्या व्यवस्थेस अनुसरून सुधारण्यांत आला आहे.

ह्या कॉलेजांतील विद्यार्थ्यांची संख्या समाधानकारक असली, तरी प्रादेशिक शाळांतील विद्यार्थ्यांची संख्या घटली आहे. डिप्लोमा व सर्टिफिकेट परीक्षा उत्तीर्ण होणारांसच बढती देण्याची प्रथा सहकारी संस्थांनीं अंमलांत आणली, तरच ह्या शिक्षण संस्थांचा उपयोग होईल. नव्या जागा भरतांनाहि ह्या परीक्षांचें महत्त्व ध्यानांत बाळगलें गेलें पाहिजे. महाराष्ट्र प्रादेशिक शाळेंतील विद्यार्थ्यांची संख्या समाधानकारक होती; धारवाड येथील शाळेंतील संख्या पूर्ववत कमीच राहिली, तर गुजरातमधील शाळेनें मात्र पिछेहाट दाखविली.

डिव्हिजनल व डिस्ट्रिक्ट को. बोर्डांच्या कार्यावरच सहकारी चळवळीचा प्रचार मुख्यत्वेंकरून अवलंबून आहे. गुजरात डि. बोर्डानें ‘सहकार’ हें साप्ताहिक सुरू केलें आहे. “ग्राम स्वराज्य” हें गुजराती मासिक चालू आहेच. मराठी “सहकारी जगत्” व कानडी “सहकार” हीं मासिकेंहि चालू आहेत. गुजरात डिव्हिजनल बोर्डानें विशेष चांगली कामगिरी केली आहे. सभासद होण्याजोग्या सोसायट्यांपैकीं ९५% सोसायट्यांना त्यानें सभासद करून घेतलें आहे. इन्स्टिट्यूटचा शिक्षणफंड गोळा करण्यांतहि त्याचा पुढाकार आहे. नॅशनल प्लॅन लोनमध्यें ५० लक्ष रुपये त्यानें जमा केले आहेत. शिक्षण–वर्ग भरविण्यापलीकडे बहुतेक जिल्हा बोर्डें काम करीत नाहींत, असें दिसतें. सहकाराच्या प्रचाराचें मुख्य साधन, ह्या दृष्टीनें इतरहि मार्गांनीं त्यांनीं प्रगति केली पाहिजे. सोसायट्यांना सभासद करून घेणें ही त्यांतील पहिली पायरी आहे. “ह्या बाबतींत आपणाला स्वतःलाहि बरेंच कार्य करावयाचें आहे. इन्स्टिट्यूटची सभासद संख्या–व्यक्ति आणि सोसायट्या दोन्ही–अहवालाचे वर्षीं घटली आहे,” असें सर जे. ए. मदन ह्यांनीं सांगितलें, हें ठीकच झालें. कारण, सहकारी चळवळीच्या केंद्रीय संस्थेचा कारभार इतरांना आदर्श होण्याकडे अधिक लक्ष पुरविण्यास वाव आहे, असा त्याचा अर्थ होतो.

सार्वजनिक महत्त्वाच्या प्रश्नांवर सहकारी कार्यकर्त्यांचें मत प्रदर्शित करण्याचें महत्त्वाचें काम इन्स्टिट्यूटनें केलें आहे. जून, १९५४ मध्यें, इन्स्टिट्यूटनें शेतीच्या मालाच्या किंमतींमधील उताराकडे सरकारचें लक्ष वेधण्याचें कार्य केलें. टॅक्सेशन इनक्वायरी कमिशनच्या प्रश्नावलीस इन्स्टिट्यूटनें तपशीलवार उत्तरें पाठविलीं व कमिशनपुढें तिच्या प्रतिनिधींनीं साक्षीहि दिल्या. इनकमटॅक्स व इतर कर ह्यांपासून माफी मिळण्याबद्दल इन्स्टिट्यूटनें विशेष प्रयत्न केले. सहकारी साखर कारखान्यांच्या स्थापनेचे कामींहि इन्स्टिट्यूटचा थोडाफार हातभार लागत आहे.

---

## भारतीय उद्योगपतींचा रशिआचा दौरा

भारतामधील उद्योगपतींचें एक प्रतिनिधी–मंडळ रशिआच्या दौऱ्यावर गेलें होतें. प्रतिनिधी–मंडळाचें नेतृत्व श्री. कस्तुरभाई लालभाई ह्यांच्याकडे होतें. मॉस्को येथें असतांना श्री. कस्तुरभाई म्हणाले कीं, आम्ही रशिआला आलों तें कांहीं ताबडतोब सौदे करण्यासाठीं नाहीं; आमचा हेतु मुख्यतः अवलोकन करून रशिआंतील वस्तुस्थिति समजावून घेण्याचा आहे. भारताप्रमाणेंच ब्रम्हदेश आणि जपान ह्या देशांचीं प्रतिनिधी–मंडळेंहि रशिअन सरकारच्या आमंत्रणावरून त्या देशांत फिरतीवर होतीं. सर्व प्रतिनिधी मंडळांनीं मिळून रशिआंतील पत्रकारांसाठीं नुकतीच एक वृत्तपत्रपरिषद भरविली होती. भारतीय उद्योगपतींनीं मध्य-आशियांतील उझबेकिस्तान ह्या सोव्हिएट उप-राज्याला भेट दिली. ह्या भागांत कापसाची लागवड मोठ्या प्रमाणावर करण्यांत येते. उझबेकिस्तानमधील कापसाच्या उत्पादनाचा भारतीय प्रतिनिधी मंडळावर बराच अनुकूल परिणाम झाला, असें समजतें. तथापि, कापसाच्या व्यवसायाबद्दल आणखीहि सुधारणा करता येण्यासारखी आहे, असें मत श्री. कस्तुरभाई लालभाई ह्यांनीं व्यक्त केलें आहे. रशिआंतील गुरांची पैदास व त्यांची व्यवस्था ह्याहि बाबतींत भारतीय प्रतिनिधींचा अनुकूल ग्रह झाला. रशिआंतील औद्योगिक कंपन्या आणि भारतामधील औद्योगिक कंपन्या ह्यांचे व्यावहारिक संबंध जुळून येण्यासारखे आहेत; पण ह्या बाबतींत दोन अडचणी आहेत. त्या म्हणजे हुंडणावळ मिळण्याची शक्यता आणि किंमती. ह्या दोन्ही बाबतींत रशिअन परराष्ट्र कचेरीशीं वाटाघाटी सुरू होण्याची शक्यता आहे, असें समजतें. भारतीय सरकार ह्यासंबंधीं योग्य तें लक्ष पुरवील, अशीं चिन्हें दिसत आहेत.

## सहकारी संस्थांचे अहवाल

( मागील अंकावरून पुढें चालू )

### २४ धी भुसावळ पीपल्स को. बँक लि., भुसावळ

१,५८९ ‘अ’ मेंबर. ७१ ‘ब’ नामधारी मेंबर. १,५०,००० रु. शेअर भांडवल. ७,५५,८३४ रु. मेंबरांकडून ठेवी. १२,२६,०७६ रु. बिन–मेंबरांच्या ठेवी. २,४४,१३७ रु. गंगाजळी व इतर फंड. १०,१५,०५२ रु. येणें कर्ज. थकबाकीचें प्रमाण १·५८ थकबाकीचें प्रमाण संशयित व बुडीत फंडाचे रकमेंतून वजा जातां, शून्य. नफा २८,९२५ रु. डिव्हिडंड ६¼%. बोनस ६¼%. एकंदर भांडवल २७,१९,२१२ रु. कर्जापोटीं गुंतविलेली रक्कम, ठेवींच्या ४९·३३% मेडिकल वस्तूंच्या योजनेचा फक्त ६५ सभासदांनीं फायदा घेतला. नवीन इमारतीचें उद्घाटन ११–४–५४ रोजीं झालें. ( चेअरमन : हरी सदाशिव खरे, वकील. मॅनेजर : जिनाभाई जी. देसाई, एफ. आय. एस. ए. इंडिया )

### २५ श्री वीरशैव को. बँक लि., कोल्हापूर

८१४ सभासद. ५६,१०० रु. शेअरभांडवल. ३५,४६६ रु. फंड्स. ३,३६,६३५ रु. ठेवी. ९८८० रु. नफा. ६¼% डिव्हिडंड. ५,०३,६०२ रु. खेळतें भांडवल. ८–१–५४ रोजीं, संस्थेचे एक आद्य संस्थापक व जवळजवळ एक तप प्रेसिडेंट असलेले मे. रावसाहेब डी. बी. माळी हे निधन पावले. ( व्हाइस प्रेसिडेंट : एम. बी. चौगुले. अॅक्टिंग मॅनेजर : एम. जी. जोटकर, बी. ए., ऑनर्स )

### २६ दि कराड सहकारी खरेदी–विक्री सोसायटी लि.

३६,८७० रु. शेअरभांडवल. ३०,५७७ रु. रिझर्व्ह फंड. ७२,३५८ रु. इतर फंड, अडतीवर मालविक्री १४,८२,८४२ रु. ची होऊन कमिशन २२,४१८ रु. मिळालें. सोसायटीला वेअरहाउसचें लायसेन्स आहे. गोदामाचा व त्यांतील मालास मिळणाऱ्या कर्जाचा फायदा बहुसंख्य शेतकरीवर्ग घेत नाहीं. संस्थेच्या पब्लिक बाँडेड वेअरहाउस (तंबाखू) मध्यें अधिकाधिक माल येत आहे. लोखंड व सिमेंटवाटपांत ६,७६,०५८ रु. विक्रीवर ६,३९० रु. कमिशन मिळालें. नफा २०,८७८ रु. डिव्हिडंड ६%. स्वतंत्र इमारत बांधून त्यांत वेअरहाउस कायद्याप्रमाणें गुदाम बांधणार. ( चेअरमन : खाशाबा विठोबा जाधव. मॅनेजर : भगवानराव नारायणराव जाधव ).

### २७ श्री महालक्ष्मी को. बँक लि., कोल्हापूर

२,७५१ सभासद. १,१८,५२५ रु. शेअरभांडवल. ५९,०६१ रु. रिझर्व्ह व इतर फंड. ११,७८,५६६ रु. रु. ठेवी. ७,८२,८४७ रु. कर्जें ४,५८,८७७ रु. इन्व्हेस्टमेंट. १४,१२,२०७ रु. खेळतें भांडवल. थकबाकी १६·२% नफा ९,३९७ रु. ( गेल्या वर्षीं ४,४८९ रु. ) डिव्हिडंड द. सा. द. शें. ३·२. ( चेअरमन : दा. श्री. मुनीश्वर, बी. ए., बी. टी. मॅनेजर : ना. गो. मुनीश्वर )

### २८ दि इसलामपूर अर्बन को. बँक लि., इसलामपूर

२३८ सभासद. २५,४०० रु. शेअरभांडवल. ८,७९६ रु. फंडस्. १,०३,२४२ रु. ठेवी. ८,०४५ रु. व्याज वसूल. २,१०७ रु नफा. २५,००० रु. सरकारी रोख्यांत गुंतवणूक. ३% डिव्हिडंड. ( चेअरमन : गोपाळ लक्ष्मण फडणीस, बी. ए., एलएल. बी. सेक्रेटरी : के. डी. बोरकर. )

### २९ पूर्व खानदेश सें. को. बँक लि. जळगांव

वरील बँकेकडे एकूण १,०८,१८,७१४ रुपयांच्या बचतठेवी आहेत. एकूण सर्व ठेवी मिळून १,८६,५८,६७० रुपयांच्या आहेत. ह्या दुरुस्तीसह २२ सप्टेंबरच्या “अर्थ”मधील अभिप्राय वाचावा.

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव मुंबई
शेअर भांडवल व रिझर्व रु. १३ ३२,८००
ठेवी .... .... .... रु. १,१२,२५,३००
एकूण खेळतें भांडवल रु. १,४६,६१,९००
शाखा:- बँकेचे सर्व व्यवहार केले जातात शाखा:-
दादर बेळगांव
माहीम पुणें

स्थापना १९१८

### ३० कोल्हापूर डि. सें. को. बँक लि.

अहवालाचे वर्षीं सर्वांगीण प्रगति. हातकणंगलें, मलकापूर, जयसिंगपूर व इचलकरंजी येथें शाखा. वडगांव व कुरुंदवाड येथें शाखा सुरू होणार. ३,०७,२३० रु. भागभांडवल. ४०,००० रु. रिझर्व्ह फंड. २४,९८,११८ रु. ठेवी. ( ३½ लक्षांची वाढ. ) १५,९४,८१८ रु. सहकारी संस्थांकडून येणें. कर्जापैकीं कांहीं रक्कम खतरूपानें आदा. व्यक्तिगत कर्जें मंजूर न करणेच्या धोरणाचा काटेकोर अवलंब. १८,२८१ रु. नफा. ३% डिव्हिडंड. ( प्रेसिडेंट : व्ही. जी. सरनाईक, एम्. ए., एलएल. बी. मॅनेजर : जी. एम्. घारगे. )

### ३१ सन्मित्र को. अर्बन बँक लि., गिरगांव, मुंबई

११७३ ‘अ’ वर्गीय सभासद. १,०५,०४८ रु. जमा झालेलें भांडवल. ३,०५,९५५ रु. ठेवी. २,२०,६२६ रु. कर्ज येणें. ४,५७,१७१ रु. खेळतें भांडवल. ९·४% थकबाकी. ८,२५० रु. नफा. ५% डिव्हिडंड. १,३३,३६१ रु. इनव्हेस्टमेंटस. रुग्णसाहित्याचा २८ सभासदांनीं उपयोग केला. गिरगावांत बँकेसाठी इमारत बांधण्याची पूर्वतयारी व पैशाची आखलेली उत्कृष्ट योजना ( चेअरमन : शंकर नारायण कानडे, एम. ए. मॅनेजिंग डायरेक्टर : शंकर विष्णु जोशी ).

### ३२ चिपळूण अर्बन को. बँक लि.

२४३० सभासद. १,१४,७२० रु. शेअर भांडवल. ७८,४०० रु. गंगाजळी व इतर निधि. १३,४९,४६६ रु. ठेवी. ८,३८,६५९ रु. कर्जाऊ गुंतलेल्या रकमा. ७,००,८४५ रु. सरकारी रोख्यांत गुंतलेल्या रकमा. १८,०८,३६८ रु. खेळतें भांडवल. ७,०५० रु. नफा. ५% डिव्हिडंड. ठेवींत १ लक्ष, ३८ हजारांची वाढ. निरनिराळ्या निधींत गतवर्षीपेक्षा १,३०० रु. ज्यास्त घालूनहि ५०० रु. अधिक नफा. खर्चाचें प्रमाण १·८७% हेड ऑफिस : चिपळूण. शाखा : दापोली व गुहागर. ( चेअरमन : बी. जी. खात, वकील. मॅनेजिंग डायरेक्टर : ग. वि. भाटवडेकर. )

### ३३ दि पैसाफंड शेतकी सहकारी बँक लि. हुपरी ( जि. कोल्हापूर )

८३३ ‘अ’ वर्ग मेंबर. २२६ ‘ब’ वर्ग मेंबर. ५०,१३० रु. शेअर भांडवल. ७,७५१ रु. रिझर्व्ह फंड. १,३४० रु. इतर फंड, २,३३,०२७ रु. खेळतें भांडवल. डिव्हिडंड ५% शेतकरी, व्यापारी व मजूर, तिन्हीं वर्गाचे लोक सभासद आहेत. कूपन्स पद्धतीनें १ पैशापासून बचत करून भिशी साठविणेची सोय. शेती विभाग, धान्य विभाग, कापड विभाग, अडत विभाग, इत्यादींची उपयुक्त कामगिरी. “सभासद व बिगर–सभासद यांना योग्य दरानें कपडे शिवून मिळावेत व सभासदांचे जुने कपडे शिवून मिळावेत, ह्या उद्देशानें शिलाई विभाग सुरू केला. शिलाईचें काम १२९६ रु. चें झालें. ( चेअरमन : एल. वाय. पाटील. मॅनेजिंग डायरेक्टर : आ. बा. नाईक ).

## सहकारी चळवळीची ह्यापुढील प्रगति


( पु. पां. गोखले, अध्यक्ष, कराड अर्बन को. बँक लि. )

"वर्गविग्रहांतून, म्हणजेच वर्गावर्गांच्या हितसंबंधांतून मार्ग काढण्यासाठी सहकारी चळवळ प्रथम मूर्त स्वरूपास आली. ती आतां खेड्यापाड्यांपर्यंत आणि गोरगरिबांपर्यंत पोंचत आहे, हा त्या चळवळीच्या उत्थापनासाठी ज्यांनीं परिश्रम केले, त्यांचा अभिमान आहे. यापुढें ही चळवळ चालवितांना सरकारी धोरण, आपल्या भौगोलिक नि कार्यक्षेत्राच्या मर्यादा, स्वदेशीय आणि जागतिक आर्थिक धोरणें यांचा समतोल संभाळून आपल्या संस्थेच्या सभासदांच्या हितसंबंधांची व उत्कर्षाची काळजी संचालकांना घ्यावी लागेल. मक्तेदारीविरुद्ध, साठेबाजीविरुद्ध, गट्टबाजीविरुद्ध सहकारानें ठाम मांडण्याची वेळ खास आली आहे. आपल्या संस्थेच्या सभासदांच्या दैनंदिन गरजांच्या वस्तुमात्रासाठी घाऊक खरेदींची व्यवस्था करणें, हातचलाऊ व्यवहारासाठी अल्पव्याजानें छोट्या छोट्या आणि अल्पमुदतींच्या कर्जवामाची व्यवस्था आपल्या सभासदांसाठी करणें, संस्थेचीं कामें व्यक्तीला कंत्राटानें देण्यापेक्षा तज्ज्ञांच्या सहकारी संस्थेला देणें, शास्त्रीय नि शैक्षणिक कार्यासाठी आणि त्यांपासून समाजाची उत्पादक सेवा होण्यासाठी झटणाऱ्यांना सहाय्यक होणें, अशी कितीतरी भरीव सेवा यापुढील काळांत सहकारी संस्थांना करतां येण्यासारखी आहे. त्यासाठी सहकारी संस्थांतून सरकारी यंत्रणेचें प्रतिनिधित्व संस्था जन्माला आल्यापासून फार तर पहिलीं पांच वर्षें ठेवावें आणि तेंही लोकविश्वासाच्या सामाजिक गृहस्थास निवडून ठेवावे; पण त्यापुढें सरकारी यंत्रणेनें आपले तपासणीचे अधिकार नियमितपणें बजावूनच अशा सहकारी संस्थांना वळण लावीत रहावें; एरवीं सरकारी यंत्रणेकडून पत सांभाळणूक, विमा, यंत्रणा, लेखा परीक्षा, यांबाबत परिपत्रकांनींच मार्गदर्शन होत रहावें; आणि परिपत्रकें आज्ञापक म्हणून सामान्य व्यवहारार्थ समजलीं जावीं; बंधनकारक नसावींत. तीं शिफारस मानूनच संस्थांचे दैनंदिन कारभार चालावेत. लोकशाहींत तळापासून कोणत्याहि चळवळीचा विकास व्हावा लागतो आणि तसा व्हावयाचा तर सहकारी संस्थांतील लोकप्रतिधींना स्वतंत्र विचारसरणीची, योजना-आंखणींची आणि कारभारकुशलतेची भरपूर सवड व सोय हवी. लोकशाही सरकारच्या यंत्रणेचा मार्गदर्शनासाठी सहकार आवश्यक हवा आणि मूळ तत्त्वांना सोडून संस्था कोठें बारगळतील तर त्यांना ताळ्यावर आणण्यासाठी तपासणीची सत्ताहि हवी. तथापि, संस्थांची कार्यक्षमता टिकावयास व वाढावयास सहकारी संस्थांच्या नियामकांना आणि कचेरींतील सेवकवृंदाला संस्थेच्या सभासदांची वैयक्तिक ओळख आणि त्यांच्या सांपत्तिक नि सामाजिक प्रतिष्ठेची स्वच्छ कल्पना यावयास हवी; एवढेंच नव्हें तर सेवकवृंद आणि नियामकमंडळ यांपैकी प्रत्येकाबद्दल सर्व सभासदांना निखालस विश्वास वाटत राहण्याचीहि आवश्यकता आहे. आपल्या देशांत आजपर्यंत औद्योगिक शहरांतून अगर नोकरीभर शहरांतून फक्त "वापरदारांच्या" ( कंझ्यूमर्स ) सहकारी संस्था निघाल्या. त्या यापुढें शेतीस अनुषंगिक, पूरक आणि स्वतंत्रपणें नागरिक जीवन वाढविणाऱ्या श्रमिकांच्या मार्फत खेड्यापाड्यांतूनहि निघतील. तेव्हां वरील दक्षता घेण्यानेंच शहरांत काय किंवा खेड्यांत काय, सहकारी चळवळी निकोप राहणाऱ्या आहेत." (अध्यक्षीय भाषण)

---


# किर्लोस्कर

## 'कल्याण' पॉवर शेंगायंत्र




हें यंत्र चालविण्यास ६/८ अश्वशक्तीचें एंजिन लागतें. दरेक तासास ७५ ते ८० पोतीं शेंग फोडली जाते.

याशिवाय कल्याण हात आणि पॉवर शेंगायंत्र आणि कॉटेज शेंगायंत्र हीं लहान यंत्रें मिळतात. गरजेनुरूप आणि पसंतीनुरूप निवड करा.

—सविस्तर माहिती मागवा—

**किर्लोस्कर बंधु लि.**

**किर्लोस्करवाडी, द. सातारा.**



# दि रत्नाकर बँक, लि.

( कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली )

**स्थापना : १९४३**

मुख्य कचेरी: भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

शाखा—सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ५,०३,३०० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | १,०८,४०० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४७,६६,००० |

—यावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील सांगली चेअरमन

श्री. गंगाराम सिद्दाप्पा चौगुले, कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल्. एन्. शहा, B. COM., C. A. I. I. B. मॅनेजर

## नागपूरमधील विद्यार्थी-जीवन

नागपूरमधील विद्यार्थ्यांच्या परिस्थितीची पहाणी करण्यांत आली असता असें आढळून आलें कीं, त्यांना रहात्या जागेची फार टंचाई आहे. त्याचप्रमाणें, आरोग्यप्रद सोयींची आणि पुरेशा सकस अन्नाचीहि त्यांना फार गरज आहे. हिस्लॉप कॉलेजच्या समाजशास्त्रीय शाखेतर्फे ही तपासणी करण्यांत आली. वसतिगृहांत अगर शैक्षणिक संस्थांतर्फे चालविण्यांत येणाऱ्या बोर्डिंगमध्यें रहाणाऱ्या विद्यार्थ्यांचा समावेश पहाणींत करण्यांत आला नव्हता. कांहीं विद्यार्थी घरांच्या व्हरांड्यांत रहात असलेले आढळून आले. ह्या ठिकाणीं ऊन अगर पाऊस ह्यांपासून निवाऱ्याचीहि सोय नव्हती. कांहीं विद्यार्थी तर एका गटाराच्या कडेलाच रहात होते. कित्येक विद्यार्थ्यांना पुस्तकें ठेवण्यास शेल्फ नसल्यामुळें ते आपलीं पुस्तकें कपडे ठेवण्याचा पेटींतच ठेवीत होते. अभ्यास करण्यासाठी पुरेशा प्रकाशाची सोयाहि कित्येक विद्यार्थ्यांना उपलब्ध नव्हती. अन्नाच्या बाबतींतहि अशीच निराशाजनक परिस्थिति आढळून आली. वाढ होत असलेल्या तरुण माणसाला दररोज ३,००० कॅलरी अन्न मिळालें तरी तेंहि अपुरें पडतें. पण नागपूरमधील कित्येक विद्यार्थ्यांना इतकेंहि अन्न रोज मिळण्याची भ्रांत पडत असल्याचें दिसून आलें. फुटबॉल, हॉकी अगर टेनिस सारख्या मेहनतीच्या खेळांत भाग घेणारे विद्यार्थी फारच कमी आढळून आले. बहुतेक विद्यार्थ्यांना सिनेमाचा शोक मात्र बराच दिसला. प्रत्येक विद्यार्थी दर महिना सरासरी ५ वेळां तरी सिनेमा-गृहाला भेट देतांना आढळून येतो. तपासणी करण्यांत आलेल्या विद्यार्थ्यांपैकीं ७० टक्के विद्यार्थी एक अगर अधिक वृत्तपत्रें वाचणारे होते. ही तपासणी करण्याच्या कामांत विद्यार्थ्यांनीं सहकार्य चांगलें दिलें. तपासणी प्रो. रामसिंग ह्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणें करण्यांत आली.

## रिझर्व्ह बँकेचें बँकर्स ट्रेनिंग कॉलेज

रिझर्व्ह बँकेच्या बँकर्स ट्रेनिंग कॉलेजमधील शिक्षणास २७ सप्टेंबर रोजीं प्रारंभ झाला. शिक्षणक्रम आठ आठवड्यांचा आहे व त्यांत भारतामधील वेगवेगळया बँकांतील २४ अधिकारी दाखल झाले आहेत. मि. एफ. एच. हेन व मि. टी. एच. हार्वे ह्या ब्रिटिश तज्ज्ञांची कॉलेजवर देखरेख आहे व तीन शिक्षकांची त्यांना मदत आहे. ह्या तिघांपैकीं एक इंपीरिअल बँकेचा व दोघे रिझर्व्ह बँकेचे अधिकारी आहेत. शिक्षणाची वेळ सकाळीं १० ते दुपारीं १२-३० व पुन: दुपारीं २ ते ४-४५ अशी आहे. सकाळीं सर्व विद्यार्थी एकत्र बसून शिक्षकांचीं अभ्यासक्रमांतील विषयांवरील व्याख्यानें ऐकतात. दुपारीं त्यांची तीन तुकड्यांत विभागणी होते. प्रत्येक तुकडी एका शिक्षकाच्या नेतृत्त्वाखाली आपआपसांत चर्चा करतात.

## "कॅनरा बँके"च्या शिक्षण वर्गांत इतर बँकांच्या अधिकाऱ्यांचा समावेश

कॅनरा बँकेच्या "बाँबे ट्रेनिंग स्कीम"च्या वर्गाचें दुसरें अधिवेशन १५ सप्टेंबर, १९५४ रोजीं सुरू झालें. त्याचें वैशिष्ट्य असें कीं, ह्या वर्गांत इतर बँकांतील दोघांना प्रवेश देण्यांत आला आहे. हे दोघे बाहेरील अधिकारी म्हणजे बँक ऑफ महाराष्ट्र लि. चे श्री. एल. जी. मराठे व सारस्वत को. बँक लि. चे श्री. एन्. आर. वरेकर, हे होत. बाकीचे सातहि जण कॅनरा बँकेंतीलच अधिकारी आहेत.

## दि ऑंध म्युच्युअल लाइफ अॅशुरन्स सोसायटी लि., पुणें

वरील म्युच्युअल विमासोसायटीनें गेल्या वर्षीं ४,०२,७५० रुपयांच्या २४७ पॉलिसी दिल्या. खर्चाचें प्रमाण गेलीं दोन वर्षे हप्त्यांत गृहीत धरलेल्या आणि मूल्यमापनांतील मार्जिनचे आंतच राखण्यांत आलेलें आहे. लाइफ अॅशुअरन्स फंडांत ९५ हजारांची भर पडून तो ६,६९,३०० रु. झाला. सोसायटीचें डिसेंबर, १९५३ अखेरचें मूल्यमापन श्री. के. ए. पंडित, अॅक्चुअरी, ह्यांनीं केलें. सोसायटीला गेलीं तीन वर्षे अनुक्रमें ३·७७, ३·३७ व ३·८९% व्याज सुटलें, तरी मूल्यमापनांत २¾% हाच दर गृहीत धरला आहे. वाढावा २७,८६९ रु. आढळला आहे. त्यांतून अनुक्रमें दरसाल ६ रु. व ८ रु. हजारीं असा तीन वर्षांचा बोनस जाहीर केला आहे. सोसायटीनें आपला कारभार कार्यक्षमतेनें व काटकसरीनें चालवून विमेदारांस रिव्हर्शनरी बोनस देण्यांत मिळविलेलें यश अभिनंदनीय आहे. (चेअरमन: मा. रा. जोशी, बी. ए. मॅनेजिंग डायरेक्टर: वि. गो. जोशी एम. ए. मॅनेजर: आर. जी. साठे).

**पार्लमेंटचें प्रतिनिधि मंडळ तुर्कस्थानला जाणार**—भारतीय पार्लमेंटच्या सभासदांचें एक प्रतिनिधि मंडळ पुढील महिन्यांत तुर्कस्थानला भेट देणार आहे, असें समजतें. तुर्कस्थानच्या पार्लमेंटच्या आमंत्रणावरून हा दौरा मुक्रर करण्यांत आला आहे.

**पाकिस्तानांतील रहदारीचे नवे नियम**—पाकिस्तानमधील वाहनांना रस्त्याच्या उजव्या बाजूनें चालण्याची सूचना देण्यांत येणार आहे. मोटारी वळविण्याचें सुकाणू बहुधा उजव्या बाजूला असतें. पण ह्या गाड्यांना डाव्या बाजूला सुकाण असणाऱ्या गाड्यांपेक्षा अधिक किंमत पडते. म्हणजे 'उजव्या बाजूनें चला' अशी सूचना केल्यामुळें पाकिस्तानच्या परदेशीय हुंडणावळीचीहि बचत होणार आहे.


दिनांक २५-१०-५४ ला प्रसिद्ध होणार

**व्याजआकारणीचें पुस्तक**

(विस्तृत जंत्रीसह)

लेखक व प्रकाशक:-कृष्ण गोपाळ घाटपांडे,
(बँक एजंट, पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.)
मिळण्याचें ठिकाण:-वडगांव स्टेशन (मध्यरेल्वे) जि. पुणें.

मूल्य:—दोन रुपये. टपालखर्च निराळा.
(बुकपोस्ट तीन आणे; रजिस्टर्ड बुकपोस्ट आठ आणे)

या पुस्तकाचे पहिल्या भागांत व्याज आणि कच्चे यांच्या आवश्यक अशा कायदेशीर माहितीसह कच्चे काढण्याच्या व व्याज आकारण्याच्या रीतींची संपूर्ण माहिती दिलेली असून व्याज आकारण्याच्या प्रत्येक प्रकाराचें एक एक उदाहरण खुलाशासह संपूर्णपणें सोडवून दाखविलेलें आहे. दुसऱ्या भागांत पावपैपासून रु. १८-१२-० पर्यंत व्याजाचे ५० दर असलेली आणि एक कोटी कच्च्यापर्यंत व्याज-आकारणी असलेली विस्तृत जंत्री आहे. त्यामुळें सहकारी सोसायट्या, बँका आणि व्याजाचा संबंध असलेल्या सर्व लहानमोठ्या कंपन्या व सावकार यांना हें पुस्तक अत्यंत उपयुक्त असें आहे. पुस्तकाबद्दल ऑडिटर आणि इतर तज्ज्ञ यांनीं दिलेले अभिप्राय पुस्तकांत मुद्रित केले आहेत.

# भारतीय उद्योगधंद्यांचें दिव्य, भव्य व सम्यग्दर्शन

## (३)

लेखकः—श्री द. बा. बर्वे, बी. ए.

पंचवार्षिक योजना विफल होण्याचीं कारणें या विषयावर एका तज्ञाचा लेख आहे. यांत त्यानें म्हटलें आहे कीं, पंचवार्षिक योजनेनें उत्पादनावर सर्व भर दिला असून उत्पादित माल खपेल कसा, त्याकरतां मागणी उत्पन्न व्हावी म्हणून कोणच्या खटपटीची आवश्यकता आहे, तसे प्रयत्न व्हावेत म्हणून अवश्य ती यंत्रणा उभी करण्याकरतां लागणाऱ्या खर्चाची तरतूद मुळींच केली नसल्यामुळें उत्पादित मालाचे साठे पडून राहूं लागले आहेत, त्यामुळें उत्पादन कमी करावें लागत आहे व त्याचा परिणाम बेकारी वाढूं लागली आहे. उत्पादन, वांटप, व वापर या तिन्हीं अंगांवर योग्य प्रमाणांत लक्ष न दिलें गेल्यामुळें पंचवार्षिक योजना ढासळूं लागली आहे. निर्यात व्यापार दरवर्षी जास्त जास्त घटत चालला आहे. ही चूक सरकारच्या आतां लक्षांत उशिरा आली असून निरनिराळ्या धंद्यांच्या मालाला परराष्ट्रांत मागणी उत्पन्न करावी म्हणून एक्सपोर्ट डेव्हलपमेंट कौन्सिल्स काढावी असें सरकारला आतां वाटूं लागलें आहे. त्याचप्रमाणें देशांतील सर्व भांडवल सरकार आपल्या विभागाच्या स्थापनेकरतां खर्चूं लागल्यामुळें खाजगी उद्योगधंद्यांच्या विभागाला भांडवलाची फार ताण पडून त्याबद्दल जिकडे तिकडे ओरड चालू झाल्यामुळें ५०० कोटी रुपयांची इंडस्ट्रीज डेव्हलमेंट कंपनी सरकारच्या प्रोत्साहनानें निघावी म्हणून सरकारचे प्रयत्न चालू झाले आहेत. सरकारच्या स्थावर मिळकतींत गुंतलेल्या एकूण रकमांची बेरीज १२३६ कोटी रुपये त्यांपैकीं ८३७ कोटी रेल्वेमध्यें, २३० कोटी इरिगेशन. उलट खाजगी उद्योगधंद्यांत जनतेनें गुंतविलेल्या रकमेची बेरीज १६०० कोटी रुपये असून ११०० कोटी रुपये उद्योगधंदे, शेतीविषयक धंदे १००कोटी रुपये, वहातुकीचीं साधनें मोटारी वगैरे १३०कोटी रुपये. राष्ट्रीय उत्पादनापैकीं ९३ टक्के खाजगी उद्योगधंद्यांतून व फक्त ७ टक्के सरकारनें चालविलेल्या उद्योगधंद्यांतून सरकारला मिळतात. शिवाय लोकसंख्येपैकीं अती थोडा भाग सरकारला कराच्या रूपानें पैसा देतो. सर्वसाधारण जनता त्या मानानें सरकारच्या उत्पन्नांत भर घालीत नाहीं. ब्रिटनमध्यें सरकारी उद्योगधंद्यांतून ३५ टक्के, अमेरिकेंत २२ टक्के, जपानमध्यें २७टक्के, त्यात्या सरकारांना सरकारी कराच्या रूपानें उद्योगधंद्यांतून मिळतात. तर भारताला फक्त सात टक्के सरकारनें चालविलेल्या उद्योगांतून मिळतात. पंचवार्षिक योजनेला १४८५ कोटी रुपये पुढील तीन वर्षांत खर्च करावयाचे आहेत. लोकांच्या जवळ पैसा नसल्यामुळें मालाचा खप कमी झाला आहे. बारा टक्क्यांनीं उत्पादन वाढलें आहे तर तितक्याच टक्क्यांनी भांडवलाच्या पुरवठ्याचें प्रमाण घटलें आहे. तात्पर्य, विक्रीला माल जास्त परंतु खरेदीला ग्राहकांच्याजवळ पैसा नाहीं. मालाच्या खपाच्या दृष्टीनें योजनेंत कांहींच सोय केली नाहीं. तेव्हां ही उणीव दूर केली पाहिजे.

भारतांत ११ संशोधन संस्था काढण्यांत आल्या असून दिल्लीला नॅशनल फिजिकल लॅबोरेटरी व पुण्यास केमिकल लॅबोरेटरी व इतर नऊ निरनिराळ्या वस्तूंच्या संशोधनाकरतां काढण्यांत आल्या आहेत. त्याशिवाय आणखी नव्या तीन मिळून १४ संशोधनाकरितां ठिकठिकाणीं लॅबोरेटरी काढण्यांत आल्या असून एकट्या बिर्ला शेटजींनीं २१लाख रुपयांची व श्री. के. डी. जालन


## दि बेळगांव बँक लिमिटेड

स्थापना १९३०] बेळगांव [शेड्यूल्ड बँक

दक्षिण महाराष्ट्रांतील व उत्तर कर्नाटकमधील पहिली शेड्यूल्ड बँक

शाखाः—संकेश्वर, होसूर (पो. शहापूर), गोकाक, वेंगुर्ले, मालवण, नंदगड, गडहिंग्लज, रामदुर्ग, चिक्कोडी, नरगुंद, शिरोडा, चिपळूण, कणकवली, निपाणी, बैलहोंगल, मिरज, अथणी, देवगड, सावंतवाडी, ठळकवाडी (बेळगांव), सौंदत्ती व जयसिंगपूर.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | रु. | २,१७,००० |
| ठेवी | रु. | ८८,००,००० चे वर |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,०८,००,००० चे वर |

बेळगांव येथें बँकेच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतींमध्यें अद्ययावत् पद्धतीचा सेफ डिपॉझिट व्हॉल्ट ता. १०।४।१९५३ पासून सुरू आहे. ता. १।९।५४ पासून सेफ डिपॉझिट व्हॉल्टमधील लॉकरचे दर लोकांचे सोयीकरितां खास कमी केले आहेत. तरी सर्वांनीं एक वेळ व्हॉल्टला भेट देऊन, सवलतीचे दराचा अवश्य फायदा घ्यावा.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

जी. एल. गजेंद्रगडकर, चेअरमन.
ए. आर. नाईक, मॅनेजिंग डायरेक्टर.
एच्. एस्. कुलकर्णी, मॅनेजर.

## सांगली बँक लि.

स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक

मुंबई शाखा — फोर्ट

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | ४½ लाख |
| रिझर्व व फंडस् | ५¼ लाख |
| ठेवी व इतर | १ कोटी |

— व्याजाचे दर —

| | द. सा. द. शें. |
|---|---|
| करंट ... ... | रु. ½ |
| सेव्हिंग ... ... | रु. १½ |
| स्पे. सेव्हिंग ... | रु. २ |
| १ वर्ष मुदत ... | रु. ३ |
| ३ वर्ष मुदत ... | रु. ४ |

कॉल डिपॉझिट स्वीकारतो.
बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात.

मॅनेजर.

यांनीं २१ लाख रुपये अशा देणग्या या कामाकरितां सरकारच्या हवालीं केल्या आहेत. या सर्व ठिकाणीं चालू असलेल्या शोधांचें संकलन व्हावें म्हणून एक नॅशनल रिसर्च डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया नांवाची मध्यवर्ती संस्था काढण्यांत आली आहे.

व्यापार व उद्योगधंद्यांची वाढ अवाढव्य प्रमाणांत सरकार करणार असल्यामुळें या उद्योगधंद्यांच्या नेतृत्वाच्या दृष्टीनें लायक माणसें शिकवून तयार व्हावीं म्हणून सरकारनें एक शिक्षण-संस्था चालू केली आहे.

भारतांत चालू असलेल्या 'पेटंट' पद्धतीबद्दल एक उपयुक्त माहितीनें भरलेला लेख एका अधिकारी माणसानें ह्या अंकांत दिला आहे. वर्षाकाठीं २००० अर्ज पेटंट मिळविण्याकरतां केले जातात. कल्पक धंदेवाल्यांनीं 'पेटंट–माइंडेड' व्हावें म्हणून या सरकारी कचेरीमार्फत प्रचार कसा केला जातो याची माहिती या लेखांत दिली आहे.

निरनिराळ्या, आपल्या देशांत उत्पन्न होणाऱ्या पुढील वस्तूंची उपयुक्त माहिती आंकडेवार दिली आहे. त्यांत कोळसा, कागद, वनस्पती तूप, ऑइल रिफायनिंग, ज्यूट, रबर, चहा, कॉफी, मिरे, प्लॅस्टिक, ॲल्युमिनिअम, सायकली, लोखंड, पोलाद, कापूस व कपडा, साखर, चामडीं इत्यादि आहेत.

त्याचप्रमाणें महत्त्वाचे आर्थिक विषयाबाबत आंकड्यांची टॅब्युलर माहिती दिली आहे:– ती पुढीलप्रमाणें (१) भारतांतील एकूण जमीन लागवडीखालील व बिनलागवडीखालील. (२) प्रांतांप्रांतांमधील लोकसंख्येचे आकडे (३) कारखान्यांतील कामकऱ्यांची संख्या. (४) औद्योगिक उत्पादनाच्या तपशिलाचे आंकडे. (५) आयात व निर्यात व्यापारविषयक आंकडेवार माहिती. (६) राष्ट्रीय उत्पादन व खर्च, इत्यादि.

जाहिरातींचा विभाग इतका सजविलेला आहे व तो इतका आकर्षक आहे व त्यांत इतक्या प्रकारच्या धंद्यांचा समावेश आहे कीं ती माहिती येथें संक्षेपानें देणें अशक्य आहे. २०६ जाहिरात-दारांपैकीं बहुतेक कंपन्या कोटी भांडवलाच्यावर आहेत त्यांपैकीं महाराष्ट्रीय कंपन्या पांचच आहेत. परदेशी कंपन्या, विशेषतः ब्रिटिश कंपन्यांच्या जाहिराती पुष्कळ आहेत. कांहीं कंपन्यांचे उद्योग पाहिले म्हणजे जीव थक्क होऊन जातो. उदाहरण म्हणून एका कंपनीचे कारखाने किती आहेत ते पुढें दिले आहेत. (१) ज्यूट मिल्स (२) कॉटन मिल्स (३) गॅस कंपनी (४) शुगर मिल्स (५) एंजिनियरिंग वर्क्स (६) इन्शुरन्स (७) ऑक्सिजन कं. (८) रोप (९) बँका (१०) साबण (११) काच असे एकूण २५ कारखाने या एकट्या कंपनीनें चालविले आहेत.

२१ लाख रुपये एका रकमेनें देणारे बिर्ला किंवा जालन सारखे लोक याच उद्योगप्रियतेनें तसें करूं शकतात. असो, शेवटीं इतकेंच सांगावयाचें कीं, महाराष्ट्राचे डोळे उघडून महाराष्ट्रीयांनीं उद्योगक्षेत्रांतील अग्रणींच्या उद्योगांचें, त्यांच्या तद्विषयक गुणांचें व हालचालींचें निरीक्षण करून महाराष्ट्र प्रांतांत उद्योगधंदे निर्माण करून महाराष्ट्र प्रांत संपन्न करण्याच्या दृष्टीनें तरुणांना स्फूर्ति मिळावी म्हणून या अंकाचें परीक्षण मुद्दाम केलें आहे. 'अर्थ' साप्ताहिकाच्या संपादकांनीं ही माहिती प्रसिद्ध करण्याची संधि दिली त्याबद्दल त्यांचे आभार मानून वाचकांची रजा घेतों. (समाप्त)


## दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना १९११

मुख्य कचेरी : ९, बँक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

टेलिफोन नं. ३८,३८१ / ३८,३८२ | पोस्ट बॉक्स नं. ४७२ / तारेचा पत्ता : फार्मरबँक

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगांसाठी दिला जातो.

भरपाई झालेलें भांडवल

| | |
|---|---|
| भागीदारांतर्फे | रु. ३४,०६,७५० |
| मुंबई सरकारतर्फे | रु. १६,००,००० |
| | रु. ६०,०६,७५० |
| गंगाजळी व फंड | रु. ५७,५४,८०० |
| ठेवी | रु. ७,९०,२५,३०० |
| खेळतें भांडवल | रु. १२,७०,२७,००० |

१६ जिल्ह्यांमध्यें ६७ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तीबद्दल चौकशी करावी.

वा. पुं. वर्दे
ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.

## भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरी:–भोर, जि. पुणें.

शाखा:–पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७१,६०० |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. — श्री. बा. ग. धंदुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:–बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबाजवळ. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी, अ. मॅनेजर. — एन्. व्ही. पांडव, मॅनेजर


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.